# प्रेस नोट

अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव
दि.१५.११.२०२१

**आलोसे श्री.अनिल लोटन देवरे, वय–४१, पोलीस कॉन्स्टेबल,नेम.दुय्यम कारागृह,भुसावळ रा.प्लॉट नं.३७, जितेंद्र नगर, नकाने रोड, धुळे,जि.धुळे यांना ३,०००/–रु.लाचेची मागणी करुन २,०००/–रुपये लाचेची रक्कम स्वीकारंताना लाचलुचपत प्रतिबंध विभाग,जळगांव यांची कारवाई.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **घटक** | :– | जळगांव |
| २ | **गुन्हा नोंद क्रमांक** | :– | भुसावळ शहर पो.स्टे. गु.र.नं. २०५/२०२१ |
| ३ | **कलम** | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम–७ प्रमाणे... |
| ४ | **आरोपीचे नांव व कार्यालय** | :– | श्री.अनिल लोटन देवरे, वय–४१, कारागृह रक्षक,नेम.दुय्यम कारागृह, भुसावळ रा.प्लॉट नं.३७, जितेंद्र नगर, नकाने रोड, धुळे,जि.धुळे<br>(कारागृह विभाग, वर्ग–३) |
| ५ | **मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम** | :– | दि.१०/११/२०२१<br>३,०००/–रु. लाचेची मागणी |
| ६ | **स्विकारलेली लाचेची रक्कम** | :– | २,०००/–रु. |
| ७ | **गुन्हा दाखल तारीख** | :– | दि.१५/११/२०२१ |
| ८ | **थोडक्यात माहीती** | :– | यातील फिर्यादी यांचा मुलगा नामे हंसराज रविंद्र खरात यांचे विरुद्ध भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन येथे हत्यार बाळगल्याचा गुन्हा दाखल आहे. त्यास दि. ०२.११.२०२१ रोजी मा.कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने त्याची न्यायालयीन कोठडी मंजुर करुन भुसावळ येथील दुय्यम कारागृह येथे पाठविले होते.सदर दिवशी फिर्यादी हे त्यांचे मुलास भेटण्यासाठी दुय्यम कारागृह भुसावळ येथे गेले असता त्यांचे मुलास जिल्हा कारागृह जळगांव येथे पाठविणार असल्याचे समजले. तेव्हा फिर्यादी यांनी जेल पोलीस देवरे यांची भेट घेतली असता त्यांनी फिर्यादीस तुमच्या मुलास जिल्हा कारागृहात पाठवुन देवु असे जेलर साहेबांनी सांगितले आहे. तुमच्या मुलाला भुसावळ येथेच ठेवायचे असेल आणि त्याला खाण्याच्या वस्तु देण्यासाठी व भेटु देण्यासाठी तसेच इतर सवलती पाहीजे असतील तर तुम्ही ३,०००/–रुपये आणुन द्या, असे सांगितल्याने फिर्यादी यांनी दि.१०/११/२०२१ रोजी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव यांचेकडेस तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव पथकाने पंच साक्षीदारासमक्ष दि.१०.११.२०२१ रोजी पडताळणी केली असता यातील आरोपी यांनी जेलर साहेबांचे नाव सांगुन स्वत:साठी पंचासमक्ष ३,०००/–रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर नमुद आरोपी यांनी सदर लाच रक्कमेपैकी २,०००/–रुपये लाचेची रक्कम पंच साक्षीदारासमक्ष फिर्यादी यांचेकडुन स्वत: वर नमुद वेळी व ठिकाणी स्विकारली म्हणुन गुन्हा. |

लचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:–** अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.
**ईमेल आयडी:–** dyspacbjalgaon@gmail.com
**संकेतस्थळ:–** acbmaharastra.gov.in
**टोल फ्री क्रमांक:–** १०६४
**दुरध्वनी क्रमांक:–** ०२५७–२२३५४७७
**व्हॉटसॲप क्रमांक:–** ८७६६४१२५२९

पोलीस उप अधिक्षक • अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव •

15-11-2021

**शशिकांत श्रीराम पाटील**
**पोलीस उप अधिक्षक**
**अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**